सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय,मंबई

दुरध्वनी क्र. ०२२-२२६२३३८०
Email Id- mahaarchaeology@gmail.com

सेट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई ४०० ००१


---

जा.क्र. आस्थापना/अज विशेषभरती मो/२०१९/१४४६, दिनांक :२६.११.२०२०

## अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली गट-क व ड मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात २०१९-२०

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि.२१.१२.२०१९ अन्वये विहित केलेल्या तरतुदी आणि निर्देशानुसार संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई या विभागाच्या अधिनस्त कार्यालयातील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या गट-क व गट -ड मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची विशेष मोहिम-२०१९-२० अंतर्गत खालील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी विहीत पात्रता धारण करीत असलेल्या व अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रधारक उमेदवारामधून सेवाप्रवेश नियमानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहीत कालबध्द कार्यक्रमानुसार भरण्याची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने वरील परिच्छेदात नमूद शासन निर्देशानुसार संचालक, पुरातत्तव व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई यांचे अधिनस्त असलेल्या सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, नागपूर व पुणे, व कोल्हापुर यांच्या आस्थापनेवरील खालील वर्ग क, व ड, संवर्गातील पंदाकरीता अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रधारक पात्र उमेदवारांकडून **दि. २८ /१२ /२०२०** पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्ज मागविण्यात येत आहेत. सरळसेवा भरती प्रकिया संदर्भातील सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असुन उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून पदनिहाय अर्ज खालील नमूद केलेल्या पत्यावर पाठवावेत.

***** अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक *****

| | |
|---|---|
| **अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक. २८ /१२ /२०२० रोजी सायंकाळी ५.४५ पर्यत** |
| **परीक्षेच्या वेळापत्रकाचा तपशील** | www.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.** |

अर्ज स्वीकारण्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ०५.४५ वाजेपर्यंत प्राप्त झालेले अर्जच फक्त स्वीकारले जातील. मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पोस्टाने/कुरियरने व अन्य यंत्रणेद्वारे पाठविलेल्या अर्जाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. पोस्टाने/कुरियर व अन्य यंत्रणेद्वारे पाठविलेल्या अर्जाच्या बंद पाकिटावर ठळक अक्षरात पदाचे नाव नमूद करण्यात यावे.

संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई अधिनस्त पुरातत्त्व विभाग पुणे व नागपूर अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी विशेष भरती मोहीम २०१९-२० अन्वये भरावयाच्या पदांचा संक्षिप्त तपशील खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **गट** | **पद संख्या** | **अर्ज सादर करण्याचा पत्ता** |
|---|---|---|---|---|
| १ | जतन सहाय्यक | क | ०१ | पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, सेटं जॉर्जेस किल्ला, सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई ४०० ००१ |
| २ | छायाचित्रचालक | क | ०१ | |
| ३ | माळी | ड | ०१ | |
| ४ | पहारेकरी | ड | ०१ | |
| ५ | रोजंदारी पहारेकरी | ड | ०१ | |
| | | **एकुण वर्ग - क व ड** | ०५ | |

**टिप :-** भरती प्रक्रियेमधील एकुण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया/परीक्षा स्थागित करणे किंवा रद्द करणे,परीक्षेचा प्रकार, समांतर आरक्षणात अंशत: बदल करणे, तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार राज्य स्तरीय निवड समिती महाराष्ट्र राज्य यांना राहतील.

**दिनांक :- २६.११.२०२०**
**स्थळ :- मुंबई**

स्वा/-

--Sd--
श्रीमती विद्या कदम,कक्ष अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई महिला अधिकारी तथा सदस्य राज्य स्तरीय निवड समिती

--Sd--
श्री. अ.ज.खंदारे,सहायक संचालक पुरातत्व विभाग, औरंगाबाद मागासवर्गीय अधिकारी तथा सदस्य राज्य स्तरीय निवड समिती

--Sd--
श्री. अनिस शेख, उपसचिव(आस्था) अल्पसंख्यांक अधिकारी तथा सदस्य राज्य स्तरीय निवड समिती

--Sd--
श्री डॉ तेजस मदन गर्गे संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय,मुंबई तथा सदस्य सचिव राज्य स्तरीय निवड समिती

--Sd--
श्री. विलास थोरात, उपसचिव(सां.का.) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,मंत्रालय, मुंबई तथा अध्यक्ष राज्य स्तरीय निवड समिती

# महाराष्ट्र शासन
# पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय,मंबई

दुरध्वनी क्र. ०२२-२२६२३३८०
Email Id- mahaarchaeology@gmail.com

सेट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई ४०० ००१

---

**जा.क्र. आस्थापना/अज पदभरती/२०२०/ १४४६,** **दिनांक : २६.१२.२०२०**

**पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयातील गट (क) व (ड) संवर्गातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील पदभरती**

**************************

पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय मुंबई , विभागाच्या अंतर्गत गट क व ड संवर्गात पुढे दर्शविलेल्या तक्त्यानुसार अनुसूचित जमाती करिता निवड व प्रतिक्षा यादी तयार करणेसाठी इच्छुक उमेदवारांकडून दिनांक २८.१२.२०२० संध्याकाळी ५.४५ वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचे लिफाफ्यावर ठळक अक्षरात "-------------------------------या पदासाठी अर्ज" असे लिहिण्यात यावे.

| अ.क्र. | पदाचे नाव वेतनश्रेणी | भरती पदसंख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| | | **गट-क** | |
| १ | जतन सहायक<br>**S-१३ :** ३५४००-११२४०० | १ | १. मान्यताप्राप्त संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकी पदवीका आवश्यक आहे.<br>२. शासकीय निमशासकीय/ खाजगी क्षेत्रातील नागरी बांधकामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा. |
| २ | छायाचित्र चालक<br>**S-१०:** २९२००-९२३०० | १ | १. महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ कायदा १९६५ नुसार निर्माण केलेल्या विभागीय मंडळाकडील माध्यमिक शालांत (SSC) प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असावे किंवा त्या समतुल्य मान्यता प्राप्त परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. शासन मान्यता प्राप्त संस्थेचे छायाचित्रणाचे प्रमाणपत्र<br>३. शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर अंतर्गत व बाह्य छायाचित्रण तसेच छायाचित्रण विकसन, छपाई, छायाचित्र प्रतिकृती व पारदर्शिका तयार करण्याचा शासकीय निमशासकीय/ खाजगी क्षेत्रातील किमान दोन वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव असावा. |
| | **एकूण** | **२ पदे** | |
| | | **गट-ड** | |
| ३ | **माळी**<br>**S-१ :** १५०००-४७६०० | १ | १. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र आवश्यक राहिल.<br>२. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>३. २ वर्षांचे कृषी विद्यापिठ शासकीय निमशासकीय/ खाजगी क्षेत्रातील पव्दिका किंवा कृषी पदवीचे प्रमाणपत्र. |
| ४ | पहारेकरी<br>**S-१ :** १५०००-४७६०० | १ | १. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र आवश्यक राहिल.<br>२. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>३. पहारेकरी या पदासाठी शारिरीक पात्रता उंची १६५ सेमी, वजन ५० कि., छाती फुगवून ८४ से.मी. व न फुगविता- ७९ सेमी |
| ५ | रोजंदारी पहारेकरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीतील दराप्रमाणे | १ | १. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र आवश्यक राहिल.<br>२. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>३. पहारेकरी या पदासाठी शारिरीक पात्रता उंची १६५ सेमी, वजन ५० कि., छाती फुगवून ८४ से.मी. व न फुगविता- ७९ सेमी |
| | **एकूण** | **३ पदे** | |
| | **एकूण (क) व (ड)** | **५ पदे** | |

अर्जाचा नमुना उमेदवारांनी www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन उपलब्ध करुन घेण्यांत यावा.

**सर्वसाधारण अटी** :-

1) शासन निर्णय क्र.एसआरव्ही 2015/प्र.क्र.404/कार्या.12, दि.25.04.2016 अन्वये उमेदवाराचे वय दि.31.12.2019 रोजी किमान 18 वर्षे व कमाल 38 वर्षे (मागासवर्गीयांकरिता 43 वर्षे) शासकीय कर्मचाऱ्यांना उच्चतम वयोमर्यादा लागू नाही.
2) उमेदवारांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक.
3) शासन अधिसूचना एसआरव्ही 2000/प्रक्र.(17/2000)/बारा, दि.28.03.2005 नुसार नमुना "अ" नियम 4 प्रमाणे लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
4) पद अ.क्र. 1 ते 4 करीता शासन निर्णय क्र. अनियो 1005 /126/सेवा-4, दि.31.10.2005 प्रमाणे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहिल.

5) वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अनियो 1006/87/सेवा-4, दि.12 जानेवारी 2007 व वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अनियो 1009/13/सेवा-4, दि.24 फेब्रुवारी, 2009 मधील सर्व अटींची पूर्तता होत असल्यासच शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होईल.

6) मागासवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत व उपलब्ध असल्यास जाती वैधतेच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत जोडणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवाराचे अर्ज सादर करता येणार नाही.

7) मागास प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिवासी उमेदवारापुरते मर्यादित राहील.

8) उमेदवार महाराष्ट्र राज्याच्या 15 वर्षा पेक्षा जास्त अधिवासी असने आवश्यक आहे.

9) **अ.क्र. 1. व 2 या वर्ग क च्या पदासाठी एमएससीआयटी अथवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C,C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण हि अनिवार्य अर्हता निश्चित केलेली असल्याने ते प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. जर विहित प्रमाणपत्र नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण 2000 /प्र.क्र.61/2001/39, दि.19.03.2003 नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विहित प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. विहित मुदतीत संगणक हाताळणी/वापरांबाबतचे प्रमाणपत्र सादर न केल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.**

10) अर्ज सर्व दृष्टींनी पूर्ण असावेत आणि विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज फेटाळण्यात येतील.

11) एकापेक्षा अधिक पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज करावा.

12) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात ---------------------------------------------नोंदणी केली असल्यास नोंदणी क्रमांक अर्जात नमूद करावा व प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी.

13) शासकीय/निमशासकीय अन्यथा अन्य प्रकारच्या नोकरीत असलेल्या उमेदवारांनी नियुक्ती अधिकाऱ्याचे मुलाखतीचे वेळी ना - हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा मुलाखत नाकारली जाईल. ज्या पदासाठी केवळ लेखी परीक्षेच्या आधारे निवड करावयाची आहे अशांनी प्रमाणपत्रे तपासणीचे वेळी ना - हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

14) पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व सविस्तर असावा.

15) अर्ज छाननी व नोंदणी शुल्क राखीव प्रवर्ग- रुपये 175/- चा धनाकर्ष किंवा पे ऑर्डर जोडणे आवश्यक आहे. तो "मुंबई" येथे देय असावा. धनाकर्ष किंवा पे ऑर्डर "**संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** " यांच्या नांवे काढण्यात यावी. माजी सैनिकांना अर्जासोबत शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

16) उमेदवारांना लेखी/चाळणी परिक्षा/प्रात्यक्षिक परिक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उमेदवारांची निवड झाल्यास गट-क मधील अ.क्र.1 ते 4 मधील पदाकरिता नियुक्ती ही पुर्ण महाराष्ट्रात कोणत्याही जिल्हयातील कोणत्याही कार्यालय/संस्थेमध्ये बदलीस पात्र असेल,

17) अर्ज "**संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबइ, सेंट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई ४०० ००१**" या पत्त्यावर पाठवावेत व पाकिटावर पदाचे नाव स्पष्ट व ठळक अक्षरात लिहावे.

18) पोस्टाची दिरंगाई अथवा इतर अन्य कोणत्याही कारणामुळे विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार न करता ते रद्द ठरविण्यात येतील.

19) अर्जामध्ये भरलेल्या माहितीच्या पृष्ठयर्थ आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे अन्यथा असे अर्ज रद्दबातल ठरविले जातील.

20) शासन तरतुदीनुसार पदवीधर/पदवीधारक अंशकालीन कर्मचारी, भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त, अपंग, माजी सैनिक इत्यादींना वयोमर्यादेत अनुज्ञेय असलेली सूट संबधित प्रवर्गातील उमेदवारांसाठी लागू राहील.

21) पुर्णवेळ कामाचा अनुभव ग्राहय धरला जाईल. अर्धवेळ मानधनावरील सेवा ग्राहय धरली जाणार नाही.

22) निवड प्रक्रिये दरम्याने व तद्‌नंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद वा अयोग्य/अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

23) पदभरतीबाबतचे संपूर्ण वेळापत्रक www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर घोषित करण्यात येईल व त्याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**विशेष सूचना** :

1) सदरहू जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत या कार्यालयास प्राप्त होतील. केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील.अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेल अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

2) अर्जांची संख्या जास्त असल्यास निकर्ष ठरवून त्या आधारे अर्जाची छाननी करुन उमेदवाराची संख्या मर्यादित केली जाईल व त्यानंतर आवश्यकतेनुसार लेखी परिक्षा व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात येईल.

3) अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन व विभागीय बदली/ पदांचा आढावा व पदांचे पुर्नजीवन न होणे इ.वा अन्य कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी/जास्त वा शुन्य होणे) व आरक्षण/समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. तसेच या व अन्य कारणामुळे निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार हे कार्यालय राखून ठेवत आहे.

4) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

5) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार निवड व नियुक्तीसाठी अपात्र ठरविला जाईल.

6) रोजगार व स्वंयरोजगार कार्यालय व अन्य प्राधिकरणे यांचेकडून प्राप्त होणाऱ्या यादीतील उमेदवारांनासुध्दा जाहीरातीतील सर्व सूचना/बाबी लागू होतील.

7) अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत उमेदवारांनी धारण केलेली अर्हताच विचारात घेतली जाईल. त्यानंतर सादर केलेली कोणतीही कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाही.

8) जाहिरातीच्या सर्व बाबीमध्ये वाढ करण्याचे /कमी करण्याचे रद्द करण्याचे अधिकार कार्यालय राखून ठेवत आहे.

9) निकर्षानुसार छाननीनंतर अपात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे कार्यालयाचे www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात येतीलय. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

## अर्जाचा नमुना

| उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो (उमेदवाराने फोटो स्वत: साक्षांकित करावा) |
|---|

अर्ज नोंदणी क्रमांक :( कार्यालयीन वापरा करिता)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१. पदाचे नांव :- --------------------------------------------
(उमेदवारांनी लिहावे

( आडनांव ) ( स्वत:चे नाव ) (वडिलांचे/पतीचे नांव)

२. उमेदवाराचे संपुर्ण नांव :- --------------------------- ---------------------------- ----------------------------

३. जन्म तारीख :- वय (दि.०१.०१.२०२० रोजीचे) :- वर्ष ------------ महिने -------- दिवस-------

४. पुरुष :- ☐ स्त्री :- ☐ विवाहीत :- ☐ विवाहीत :- ☐ (योग्य त्या ठिकाणी ☑अशी खुण करावी)

५. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता :-------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------------------------------------------

६. सामाजिक आरक्षण :- (योग्य त्या ठिकाणी ☑अशी खुण करावी)

| अ.जा | अ.ज. | विजा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीस | ईडब्ल्युएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

जात :- -------------------------- पोटजात :- -----------------------------------------------

७. समांतर आरक्षण :- (योग्य त्या ठिकाणी ☑अशी खुण करावी)

| महिला | अपंग | खेळाडू | माजी सैनिक | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| | | | | |

८. स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांचे पाल्य/जनगणना कर्मचारी/अंशकालीन कर्मचारी/प्रकल्पग्रस्त/हजेरी सहाय्यक/माजीसैनिक/खेळाडू (अनावश्यक खोडावे)

९. अपंग असल्यास अपंगत्वाचा प्रकार व प्रमाण (------%) :- (योग्य त्या ठिकाणी ☑अशी खुण करावी)

| अल्पदृष्टी(LV) | कर्णबधीर(HH) | अस्थिव्यंग(OL) |
|---|---|---|
| | | |

१०. धनाकर्षाचा तपशील ( Demand Draft/Pay Order Details):- (योग्य त्या ठिकाणी ☑अशी खुण करावी)

| धनाकर्ष क्रमांक | दिनांक | रक्कम | बँकेचे नाव | शाखा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११. शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | परीक्षा | शाळा/मंडळ/विद्यापीठ | उतीर्ण झाल्याचे वर्ष*महिना | टक्केवारी | श्रेणी | छायांकित प्रत जोडली असल्यास ✓अशी खुण करावी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी.(दहावी) | | | | | |
| २ | एच.एस.सी.(बारावी) | | | | | |
| ३ | पदवी (बी.ए./बी.कॉम/बी.एससी) | | | | | |
| ४ | आय.टी.आय. | | | | | |
| ५ | तांत्रिक पदविका | | | | | |
| ६ | तांत्रिक पदवी/पदवी | | | | | |
| ७ | पदव्युत्तर पदवी/पदविका | | | | | |
| ८ | एम.एस.सी.आय.टी. | | | | | |
| ९ | टंकलेखन (मराठी व इंग्रजी) | | | | | |
| १० | इतर | | | | | |

१२. अनुभव :-

| पदनाम | वेतनश्रेणी | कार्यालय/संस्था/औद्योगिक आस्थापनाचे नाव | पासुन | पर्यंत | वर्ष व महिने | कामाचे संक्षिप्त स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

१३. उमेदवाराबाबत इतर संक्षिप्त माहिती -----------------------------------------------

| अ.क्र. | प्रमाणपत्र | प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | छायांकित प्रत जोडली असल्यास ✓अशी खुण करावी |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याचे प्रमाणपत्र | | |
| २ | जात प्रमाणपत्र | | |
| ३ | जात वैधता प्रमाणपत्र | | |
| ४ | नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र | | |
| ५ | अपंगत्वाचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र | | |
| ६ | खेळाडूंच्या बाबतीत खेळाचे प्रमाणपत्र | | |
| ७ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | | |
| ८ | जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र | | |

मी याव्दारे जाहिर करतो/ करते की, माझ्या माहिती व ज्ञानानुसार वरील तपशील सत्य आणि अचुक आहे. आणि नंतर कोणताही तपशील खोटा आढळल्यास माझी उमेदवारी/नियुक्ती रद्द झाल्यास अथवा होणाऱ्या कोणत्याही कारवाईस माझी काहीही हरकत राहणार नाही. अर्ज उशीरा प्राप्त झाल्यास, अर्ज परिपुर्ण नसल्यास अथवा पृष्ठयर्थ आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्यास अर्ज रद्द ठरविला जाईल व त्याबाबत माला काहीही कळविले जाणार नाही याची मला जाणीव आहे. जाहिरातीतील सर्व अटी व शर्थी मी वाचलेल्या असून त्या मला मान्य आहेत.

तारीख :-

स्थळ :- अर्जदाराची सही

---

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन ) नियम-२००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना -अ

प्रतिज्ञापत्र (विवाहित उमेदवारासाठी)

नमुना -अ

(नियम ४ पहा)

मी श्री/श्रमती/कुमारी-----------------------------------------------श्री------------------------------------------------ ---यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी,वय------------वर्ष रहाणार------------------------------------------------------------ ---------------------------------------या व्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

(१) मी -----------------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला-------------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------आहे.(असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च २००५ व तदनंतर आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

तारीख :-

स्थळ :- अर्जदाराची सही

---

**पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयातील गट (क) व (ड) संवर्गातील अनुसूचित जमाती संवर्गातील पदभरती**

**परीक्षसाठी ओळखपत्र**

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून तो राजपत्रित अधिकारी यांच्याकडून स्वाक्षांकित करुन घेण्यात यावा. |
| --- |

१) पदाचे नांव :-

२) उमेदवाराचे संपुर्ण नाव :-

३) परीक्षेचा आसन क्रमांक :-

४) परीक्षा केंद्र :-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

५) परीक्षेचा दिनांक व वेळ :-

६) उमेदवाराची नमुना स्वाक्षरी :-

(फोटो राजपत्रित अधिकारी/विशेष कार्यकारी अधिकारी किंवा शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे. ओळखपत्रातील क्रं.३,४,५ वरील माहिती वगळून इतर माहिती उमेदवारानी अर्ज सादर करतेवेळीस स्वत :भरावी.)

---